








# स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड तिरंगामय तेजात न्हाऊन निघाले!

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या इमारतीवर तिरंग्याची झळाळी, आकर्षक विद्युत रोषणाईने उजळलेले रस्ते, आणि मनामनांत देशभक्तीची ज्वाला अशा उत्साहमय वातावरणात पिंपरी चिंचवड शहर आज भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. केशरी, पांढरा आणि हिरव्या प्रकाशाचा मोहक संगम जणू स्वातंत्र्याच्या इतिहासातील प्रत्येक पान उजळवत आहे. महापालिकेच्या मुख्य इमारतीपासून उड्डाणपूलांपर्यंत, आणि उद्यानांपासून ऐतिहासिक वास्तूंपर्यंत सर्वत्र तिरंगामय तेज पसरले आहे.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीसह शहरातील विविध ऐतिहासिक वास्तू, उड्डाणपूल, शासकीय इमारती आदी ठिकाणी आकर्षक तिरंगी विद्युत रोषणाईने करण्यात आली आहे. विशेषतः नाशिक फाटा उड्डाण पूल आणि मदर तेरेसा उड्डाण पूल केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या रंगांच्या प्रकाशात न्हाऊन निघाले आहेत. या रंगांचा मोहक संगम नागरिकांना एकतेची, अभिमानाची आणि देशभक्तीची अनुभूती देत आहे. केंद्र शासनाच्या 'घरो घरी तिरंगा' मोहिमेच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय भवन, क्षेत्रीय कार्यालये, उड्डाणपूल तसेच उद्याने यांच्यामध्ये ही रोषणाई साकारण्यात आली आहे.

हा उपक्रम केवळ शहराचे सौंदर्य वाढवत नाही, तर स्वातंत्र्याच्या अमूल्य पर्वाची आठवण करून देतो आणि देशभक्तीची ज्वाला प्रत्येक मनामनात प्रज्वलित करीत आहे. या मोहक रोषणाईमुळे शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक नागरिक भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या स्वागतासाठी सजलेल्या या इमारती व पूल आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात टिपून या क्षणांना कायमस्वरूपी साठवून ठेवत आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये झळकणारा तिरंग्याचा प्रकाश जणू स्वातंत्र्याच्या गौरवगाथेचा उज्ज्वल साक्षीदार ठरत आहे.

# हर घर तिरंगा अभियानास आळंदीत उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

हर घर तिरंगा अभियानांतर्गत आळंदी नगरपरिषदेअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांपासून नागरिक, कर्मचारी, महिला बचत गट, विविध संस्था यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे, अशी माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली आहे. आळंदी शहरात हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता स्पर्धा व विविध देशभक्तीपर व जनजागृतीचे उपक्रमाचे पुढीलप्रमाणे आयोजन करण्यात आले. ७ ऑगस्ट रोजी आळंदी नगरपरिषद शिक्षण विभाग शाळा क्रमांक दोन व चार या शाळां मधील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची भावना स्वच्छतेचे महत्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. ८ ऑगस्ट रोजी आळंदी नगरपरिषद शाळा क्र. ३ येथे चित्रकला स्पर्धा तसेच तिरंगा राखी मेकिंग स्पर्धा तिरंगा रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. ११ ऑगस्ट रोजी आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक ४ मध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त हस्ताक्षर स्पर्धा व माझे संविधान या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. १२ ऑगस्ट रोजी आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक चार मध्ये समूहगीत गायन स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. उपक्रमांच्या माध्यमातून स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, देशभक्ती आणि सामूहिक जबाबदारी यांचे प्रभावी संदेश देण्यात आले. हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियानांतर्गत आळंदी शहरात घेतलेले हे विविध उपक्रम नागरिकां मध्ये राष्ट्रीय अभिमानाची भावना, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारे ठरले, अशी माहिती श्री. खांडेकर यांनी प्रसिध्दीपत्रकान्वये दिली.

# हर घर तिरंगा अभियानास इंदापूरात उत्सर्फूत प्रतिसाद - मुख्याधिकारी रमेश ढगे

**पुणे । प्रतिनिधी**

इंदापूर नगरपरिषदेच्यावतीने हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता स्पर्धा व अभियानांतर्गत शहरात विविध देशभक्तीपर व जनजागृतीचे उपक्रमाचे आयोजित करण्यात आले, या उपक्रमास उत्सर्फूत प्रतिसाद लाभला आहे, अशी माहिती मुख्याधिकारी रमेश ढगे यांनी दिली आहे.

शहरात ७ ऑगस्ट रोजी विद्या प्रतिष्ठान येथे वृक्ष लागवड, नागरिकांना हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता स्पर्धाअभियानाची माहिती देऊन देशभक्ती व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ८ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शाळा क्र.२ येथे स्वच्छता कर्मचारी यांचा गुणगौरव, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या अमृत वाटिका येथे विविध संस्था, नागरिक, कर्मचारी व अधिकारी यांच्या सहभागातून महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. नगरपरिषद कार्यालयापासून ४० फूट रोड - दर्गा मज्जिद चौक - नेहरू चौक - बाबा चौक मार्गे पुन्हा नगरपरिषद असा मार्ग घेत भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. नारायणदास रामदास हायस्कूल येथे प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. शहरात ११ ऑगस्ट नारायणदास रामदास हायस्कूल येथे राखी स्पर्धा आणि १२ ऑगस्ट रोजी नारायणदास रामदास हायस्कूल येथे रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. नगरपरिषद प्रांगणात शहरातील बचत गट व महिला यांच्या सहभागातून रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. महिलांनी स्वच्छता व देशभक्तीचा संदेश देणाऱ्या रांगोळ्यांद्वारे सुंदर कलाकृती साकारल्या.

या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांपासून नागरिक, कर्मचारी, महिला बचत गट, विविध संस्था यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, देशभक्ती आणि सामूहिक जबाबदारी यांचे प्रभावी संदेश देण्यात आले. हर घर तिरंगा, घरघर तिरंगा अभियानांतर्गत इंदापूर शहरात घेतलेले हे विविध उपक्रम नागरिकांमध्ये राष्ट्रीय अभिमानाची भावना, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारे ठरले आहे, अशी माहिती श्री. ढगे यांनी दिली आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचा प्रयत्न झाला.

# कामगार मंत्र्यांनी केली 'कामगार भवन' इमारतीची पाहणी



**पुणे । वार्ताहर**

जुना मुंबई-पुणे रोड, शिवाजीनगर येथे बांधण्यात येत असलेल्या कामगार भवन इमारतीच्या बांधकामाची कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी पाहणी करून सद्यस्थितीबाबत माहिती घेवून संबंधितांना इमारतीच्या बांधकामाबद्दल सूचना दिल्या. यानंतर कामगार मंत्री फुंडकर यांनी इमारत बांधकामाचे कंत्राटदार रवी शिंदगे यांना इमारतीचे बांधकाम डिसेंबर २०२५ अखेर पर्यंत पुर्ण करुन देण्याबाबत आदेश दिले. यावेळी उपस्थित सार्वजनिक बांधकाम विभाग, कामगार विभाग, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचानालयाच्या अधिकाऱ्यांना या कामगार भवनाचे बांधकाम वेळेत पूर्ण करुन घेण्याबाबत कंत्राटदाराकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून वेळोवेळी पाठपुरावा करण्याची सूचनाही त्यांनी दिली. या कामगार भवन इमारतीमध्ये अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे, कामगार उप आयुक्त, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पुणे, बाष्पके संचलनालय, पुणे आणि महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ, पुणे आदी कार्यालयांचा समावेश असणार आहे.

या पहाणीवेळी कामगार विभागाचे अपर कामगार आयुक्त बाळासाहेब वाघ, कामगार उप आयुक्त (प्र.) निखिल वाळके, अधीक्षक अभियंता भरत कुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता डॉ. सुरेंद्रकुमार काटकर, ऊखडक व बाष्पके संचालनालयाचे अधिकारी व मे. ओंकार कन्स्ट्रक्शन, (कंत्राटदार) उपस्थित होते.

# 'महाज्योती' कडून मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाची संधी

**पुणे । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या समान धोरणांतर्गत कार्यरत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे सन २०२५-२६ साठी मोफत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाकरिता अर्ज प्रक्रिया सुरु असून www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर २० ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज ऑनलाइन स्वीकारले जाणार आहेत. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी केले आहे. ही योजना इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) आणि विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) मधील विद्यार्थ्यांसाठी आहे. शासनाच्या समान धोरणांतर्गत 'महाज्योती' मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग राजसेवा तसेच संयुक्त गट 'ब' व 'क' अशा राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणाबाबतची सर्व माहिती, पात्रता निकष, अटी-शर्ती आणि अर्ज प्रक्रिया संकेतस्थळावर सविस्तर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना अनिवासी व ऑफलाईन माध्यमांतून प्रशिक्षण घेण्याची सुविधा देण्यात आली आहे. ऑफलाइन प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा विद्यावेतन तर प्रशिक्षणाच्या प्रारंभी एकरकमी आकस्मिक निधी मिळणार आहे. प्रशिक्षण नामांकित संस्थांमार्फत दिले जाणार असून प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड प्रवेश परीक्षेद्वारे केली जाईल. अधिक माहितीसाठी ०७१२-२८७०१२०/१२१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे श्री. वावगे यांनी कळविले आहे.

अतुल सावे, मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण: महाज्योतीने सामाजिक परिवर्तन घडवणारी चळवळ हाती घेतली असून स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षण योजनेद्वारे विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षणासह विद्यावेतनाचे आर्थिक पाठबळ दिले जात आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण व स्पर्धा परीक्षां मध्ये यश मिळविण्याच्या संधी उपलब्ध होत आहेत. परिणामी, बहुजन प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक व दीर्घकालीन परिवर्तन घडत आहे.

ही योजना फक्त प्रशिक्षणापुरती मर्यादित नाही, तर ती विद्यार्थ्यांच्या भविष्यातील प्रगतीचा पाया आहे. यातून त्यांना केवळ ज्ञानच नव्हे, तर आत्म विश्वास आणि संधी मिळेल. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून यशाचे शिखर गाठण्याचे स्वप्न पाहणाऱ्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत नोंदणी करावी.

# ड्रोन कॅमेराद्वारे चित्रीकरण करण्यास प्रतिबंध आदेश जारी


**पुणे । वार्ताहर**



पुणे ग्रामीण जिल्ह्यात कोणत्याही खाजगी व्यक्ती, कार्यक्रम व्यवस्थापन (इव्हेंट मॅनेजमेंट) व छायाचित्रण करणाऱ्या व्यावसायिकांनी ड्रोन कॅमेराचा वापर करताना त्याची पूर्व माहिती ७ दिवस आधी संबंधित पोलीस ठाण्यास कळवून संबंधीत प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांची रितसर परवानगी घेणे बंधनकारक राहील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केले आहेत.

जिल्ह्यात महत्त्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था असून दहशतवादी कारवायांमध्ये ड्रोन कॅमेराद्वारे टेहळणी होवून त्याचा अतिरेकी कारवायांमध्ये उपयोग केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दौंड, बारामती, शिरुर तालुक्याच्या परिसरामध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडत असल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असून नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळू माफिया देखील टेहळणीसाठी ड्रोनचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ड्रोनच्या मध्यमातून टेहाळणी करुन इतर प्रकारच्या चोऱ्याही होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

हे आदेश १२ ऑगस्ट २०२५ पासून पुढील दोन महिन्यांसाठी लागू राहतील. आदेशाचा भंग करुन पोलीसांच्या परवानी शिवाय कोणताही व्यक्ती ड्रोन कॅमेरादवारे चित्रीकरण करताना आढळून आल्यास अशी व्यक्ती भारतीय न्याय संहितेचे कलम २३३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



# गणेशोत्सव काळात विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश जारी

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव शांततामय वातावरणात पार पाडावा, गणपती विसर्जन मिरवणूका रात्री उशिरापर्यंत चालू असल्याने या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, याकरिता तालुका स्तरावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी नियुक्तीबाबत अपर जिल्हा दंडाधिकारी ज्योती कदम यांनी आदेश जारी केले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव २७ ऑगस्ट २०२५ रोजी सुरुवात होणार असून ६ सप्टेंबर २०२५ अनंत चतुदर्शीच्या दिवशी सांगता होणार आहे.जिल्ह्यामध्ये साधारणतः ५ व्या, ७ व्या, आणि ९ व्या दिवशी गणपती विसर्जन होतात. मोठ्या मंडळांचे दहाव्या, अनंत चतुर्शीच्या दिवशी गणपती विसर्जन केले जाते. या दिवशी ठिकठिकाणाहून गणेश विसर्जन मिरवणूका मोठ्या प्रमाणात निघतात. तसेच ठिकठिकाणी नागरिक मोठ्या प्रमाणावर गर्दी करीत असतात, या संपुर्ण बाबीचा विचार करता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १४ नुसार तालुका स्तरावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची नियुक्ती केल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# एलपीएफने ४ उत्सव साजरे केले: स्वातंत्र्य दिन, एलपीएफ प्रभावाची ३० वर्षे- रक्तदान मोहीम आणि इन्स्पिराचे प्रकाशन

**पुणे । प्रतिनिधी**

लीला पूनावाला फाउंडेशन (एलपीएफ) ने १६ ऑगस्ट २०२५ रोजी एका भव्य कार्यक्रमात ४ महत्त्वाचे उत्सव एकत्र करून एक ऐतिहासिक प्रसंग साजरा केला:

१. ७९ वा स्वातंत्र्य दिन
२. फाउंडेशनचा उल्लेखनीय ३० वर्षांचा प्रवास
३. इन्स्पिराचे प्रकाशन (एलपीएफ न्यूजलेटरची ६५ वी आवृत्ती)
४. रक्तदान मोहीम

भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर स्कूल ऑफ एक्सलन्स, बाणेर, पुणे येथे आयोजित हा कार्यक्रम अक्सिस बँक (पीबी शाखा), पुणे आणि भारती विद्यापीठ रुग्णालय, पुणे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. या समारंभाला प्रमुख पाहुणे पद्मश्री लीला पूनावाला (अध्यक्ष, एलपीएफ), श्री. फिरोज पूनावाला (संस्थापक विश्वस्त, एलपीएफ), सन्माननीय अतिथी श्री. भूषण वैद्य (क्लस्टर प्रमुख- वरिष्ठ उपाध्यक्ष-१, अक्सिस बँक, पीबी शाखा, पुणे) आणि डॉ. भाग्यश्री (प्राचार्य, भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज, पुणे) आणि सुश्री शर्मिला गोवंडे (वरिष्ठ महाव्यवस्थापक - ऑपरेशन्स, एलपीएफ) उपस्थित होते.


रक्तदान मोहिमेला प्रचंड प्रतिसाद मिळाला, १०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करण्यासाठी पुढाकार घेतला, ही एक सामर्थ्यवान देण्याच्या भावना,एकता, आशा होती. या उपक्रमाने भारताच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा केला आणि मुलींच्या शिक्षणाच्या मुख्य ध्येयापलीकडे जाऊन समाजाची सेवा करण्याची एलपीएफची वचनबद्धता प्रतिबिंबित केली.

या प्रसंगी बोलताना, एलपीएफचे संस्थापक विश्वस्त म्हणाले, आजचा दिवस आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करण्याचा आणि समाजाला अर्थपूर्ण योगदान देण्याचा आहे. दान केलेला प्रत्येक थेंब हा जीवनाची देणगी आहे आणि गरजू व्यक्तीसाठी आशेचा किरण आहे.

स्वातंत्र्य, सेवा आणि प्रभावाच्या ३० वर्षांच्या या एकत्रित उत्सवाद्वारे, एलपीएफने आपला विश्वास पुन्हा एकदा व्यक्त केला की खरी प्रगती मनांना सक्षम बनवून आणि जीवनाचे संगोपन करून होते.







# आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांना पुण्यात 'सेफ हाऊस' 'विचारवेध असोसिएशन' चा पुढाकार

**पुणे । प्रतिनिधी**

विचारवेध असोसिएशन'च्या पुढाकाराने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या युवक युवतीना विवाहानंतर पुण्यात काही काळ सुरक्षित घर ( सेफ हाऊस) सुविधा विनामूल्य उपलब्ध केली असल्याची माहिती असोसिएशनने पत्रकाद्वारे दिली.अधिक माहिती साठी अनिकेत साळवे ८७९६४०५४२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आंतरजातीय,आंतरधर्मीय विवाह संकल्पनेला समाजातून पाठिंबा देण्यासाठी 'विचारवेध असोसिएशन' कार्यरत आहे. त्या दृष्टीने काही सुस्थित, प्रतिष्ठित कुटुंबांनी अशा जोडप्यांना विवाहानंतर दोन महिने आधार देण्याची तयारी दाखवली आहे. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने हा आधार विनामूल्य असेल. बाणेर, खडकी, बावधन, औंध, केशवनगर अशा ठिकाणी ही सेफ हाऊस उपलब्ध केली आहेत.

> **'विचारवेध असोसिएशन' च्या पुढाकाराने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह संकल्पनेला पाठिंबा देण्यासाठी नवे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या उपक्रमांत इच्छुक युवक-युवतींसाठी समुपदेशन व मार्गदर्शन, आर्थिक सहाय्याचे सल्ला, जोडपे एकत्र आणण्यासाठी कार्यक्रम, व्याख्याने तसेच सुरक्षित निवासासाठी 'सेफ हाऊस' यांचा समावेश आहे. समाजात आंतरजातीय विवाहाबाबत असलेले गैरसमज दूर करून, विवाह करणाऱ्यांना आधार देण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे.**

या उपक्रमाचा उद्देश आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना समाजातील विरोध, दबाव व सुरक्षिततेच्या समस्यांवर तात्पुरता दिलासा देणे हा आहे. अनेकदा अशा विवाहानंतर मुला-मुलींना नातेवाईकांचा विरोध, धमक्या किंवा मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांना सुरक्षित आसरा मिळावा यासाठी विचारवेध असोसिएशनने ही पुढाकार घेतली आहे. युवक-युवतींसाठी ही योजना आधारवड ठरणार आहे.